# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दूरध्वनी क्र. 020-26123371 Email-homebranchpune@gmail.com

वाचावे:- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.
2. भारतीय साथ् रोग नियंत्रण अधिनियम 1897.
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसूचना कोरोना 2020/प्र.क्र 58/आरोग्य 5 दिनांक 14/3/2020
4. या कार्यालयाकडील आदेश क्रमांक जि.आ.व्य./कावि/217/2020 दिनांक 27/3/2020

---

क्र. जि.आ.व्य/कावि/२४४/2020
पुणे, दिनांक ३० /03/2020

**विषय:- कोरोणा विषाणु कोव्हीड 19 चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**आदेश**

ज्याअर्थी, संदर्भ क्र 4 चे आदेशान्वये कोरोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणुन जिल्हयातील सर्व खाजगी दवाखाने, रुग्णालये सुरु ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

तथापि, प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हयातील वैदयकिय व्यवसायीक, नर्सीग व पॅरामेडीकल स्टाफ, आरोग्य सेवेशी संबंधित व्यक्ती यांनी त्यांच्या आरोग्य सेवेसबंधी व्यवसायाकरीता भाडे तत्वावर घेतलेल्या रहिवासी / वाणिज्य मालमत्तांचे मालक House Owner हे सदर वैदयकीय व्यवसायीकांना अशा मालमत्ता रिक्त करणेसाठी दबाव आणत आहे. अशा प्रकारचे वर्तन हे वैदयकिय सेवेवरील ताण वाढविण्यास कारणीभुत ठरु शकते.

त्यामुळे संदर्भिय आदेशान्वये मला प्राप्त् अधिकारानुसार आदेश देतो की, आयुक्त पुणे महानगरपालिका / आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपविभागीय दंडाधिकारी, कार्यकारी दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अशा खाजगी मालमत्ता मालकांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897 व भारतीय दंड संहीता 1860 कलम 270 च्या तरतुदीनुसार दंडनिय कारवाई करावी.

स्वाक्षरी /- x x x
(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे.**

**प्रत**:- 1. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
2. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
3. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
4. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व ------- यांना पुढील कार्यवाहीसाठी.
5. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी सर्व ----------- यांना पुढील कार्यवाहीसाठी.
6. मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद सर्व --------- यांना पुढील कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

(डॉ.जयश्री कटारे)
**अप्पर जिल्हादंडाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.**

स्थ्ळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांची स्वाक्षरी असे.

C:\Users\sadgar\Desktop\Order covid१९_DC१.docx

Scanned with CamScanner